आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटिंग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१६० ■ गुरुवार २० मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

## अखेर प्रतीक्षा संपली! सुनीता विल्यम्स पृथ्वीवर उतरल्या

**वॉशिंग्टन, दि.१९- तब्बल नऊ महिने अंतराळात अडकलेले अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे अखेर पृथ्वीवर परत आले आहेत. भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.३० वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्याजवळ नासाचे हे दोन्ही अंतराळवीर सुरक्षितपणे खाली उतरले. याबरोबरच मुळात आठ दिवसांसाठी नियोजित असणारी ही मोहिम नऊ महिन्यानंतर संपुष्टात आली आहे.**



दरम्यान नासाने अंतराळवीर जमीनीवर उतरले त्या क्षणाचा व्हिडीओ शेअर केला आहे. भारतासह संपूर्ण जगभरातून या अंतराळवीरांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही दोघांना शुभेच्छा दिल्या.

सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचे स्पेसएक्स कॅप्सूल आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशनहून निघाल्यानंतर काही तासांतच बुधवारी सकाळी गल्फ ऑफ मेक्सिको येथे उतरले. फ्लोरिडातील तल्लाहसीच्या किनाऱ्याजवळ हे कॅप्सूल उतरले. जगभरातून अनेकांच्या नजरा या अंतराळवीरांच्या परतीच्या प्रवासाकडे लागल्या होत्या. नासाचे हे दोन्ही अंतराळवीर सुरूवातीला अवघ्या एक आठवड्याच्या कालावधीसाठी अंतराळात गेले होते. पण बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातील तांत्रिक अडचणींमुळे सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचा मुक्काम वाढला होता. त्यानंतर आता स्पेसएक्स क्रू ड्रॅगन कॅप्सूलच्या माध्यमातून सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी त्यांच्या परतीचा प्रवास पूर्ण केला आहे. रविवारी आयएसएसमध्ये पोहोचलेल्या १० व्या चमूकडे सुनीता आणि बुच यांच्या नवव्या चमूने सूत्रे सोपविल्यानंतर दोघांच्याही परतीच्या प्रवासाची तयारी सुरू झाली होती. नासा आणि स्पेस एक्सच्या तंत्रज्ञांची बैठक होऊन फ्लोरिडामधील वातावरणाचा अंदाज घेण्यात आल्यानंतर परतीचा प्रवास एक दिवस आधीच सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सुनी विल्यम्स, बुच विल्मोर यांच्याबरोबर अंतराळवीर निक हेग, अलेक्झांडर गोर्बुनोव्ह हे देखील पृथ्वीवर परतले असल्याची माहिती नासाने दिली आहे. तर विल्यम्स आणि विल्मोर यांनी ऐकूण २८६ दिवस अंतराळात घालवले आहेत. म्हणजेच एकूण नियोजित दिवसांपेक्षा २७८ दिवस जास्त काळ त्यांना अंतराळात राहावे लागले. या लांबलेल्या मोहिमेदरम्यान त्यांनी ४,५७६ वेळी पृथ्वीला फेरी मारली आणि पृथ्वीवर सुरक्षितपणे परतण्याआधी जवळपास १९५ दशलक्ष किलोमीटर प्रवास केला. या दोन्ही अंतराळवीरांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी नासाने उद्योगपती एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स या खासगी अंतराळ संशोधन कंपनीबरोबर मिळून मोहीम आखली होती. या मोहिमेला यश आलं आहे. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या यशस्वी मोहिमेनंतर नासा व स्पेसएक्सचं अभिनंदन केलं आहे. तसेच एलॉन मस्क यांचे आभार मानले आहेत.

### संघाने मांडली भूमिका
## औरंगजेब सध्याच्या घडीला सुसंगत नाही!

नागपूर, दि.१९- औरंगजेबाच्या कबरीवरून महाराष्ट्रात वादविवाद सुरू आहेत. नागपूरमध्ये याच मुद्यावरून वाद वाढला आणि हिंसेचा भडका उडाला. नागपूरमध्ये झालेली दंगल आणि औरंगजेब मुद्दा याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका काय? असा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून उपस्थित केला जात होता. अखेर संघाने यावर स्पष्ट भूमिका मांडताना हा औरंगजेब आजच्या घडीला सुसंगत नाही, असे म्हटले आहे. बंगळुरूमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा २१ ते २३ मार्च दरम्यान होत आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक (पान ४ वर)

## नागपूर दंगल; बाराशेहून अधिक संशयितांविरुद्ध गुन्हे पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांना सोडणार नाही : मुख्यमंत्री

**नागपूर, दि.१९ नागपुरातील दंगलींचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि समाजमाध्यमांवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमधून माहिती घेऊन पोलीस संशयित आरोपींची धरपकड करीत आहेत. आतापर्यंत कोतवाली, गणेशपेठ आणि तहसील पोलीस ठाण्यात तब्बल बाराशे पन्नास संशयित आरोपींविरुद्ध सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी दोनशे आरोपींची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले असून साठ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा कसून शोध घेतल्या जात आहेत. मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा ही दंगल पुर्वनियोजित असल्याचा पुनरुच्चार केला आहे.**




दरम्यान, पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांना अद्दल घडवणारच, या भूमिकेचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी आज विधानसभेत केला. मी पुन्हा सांगतो, नागपूर प्रकरणात ज्यांनी पोलिसांवर हल्ले केले असतील, त्यांना कबरीतूनही खोदून काढू. सोडणार नाही. बाकी सगळ्या गोष्टी क्षम्य आहेत. पण पोलिसांवर हल्ला क्षम्य नाही. त्यामुळे त्यांच्यावर कठोरातली कठोर कारवाई नियोजित वेळेत केली जाईल, असे फडणवीस म्हणाले. आता नागपूर शांत आहे. नागपूर शांततेसाठीच प्रसिद्ध आहे. १९९२ नंतर नागपुरात कधीही दंगल झालेली नाही. परवाची झालेली घटना काही लोकांनी जाणीवपूर्वक घडवून आणली हे लक्षात येते. तिथे औरंगजेबाची कबर जाळली गेली. त्यावर कुठलीही आयात लिहिलेली नव्हती. आम्ही या गोष्टीचा सखोल तपास केला आहे. पण जाणीवपूर्वक आयाती जाळल्या अशा प्रकारचे संदेश पसरवण्यात आले आणि त्यातून ही पुढची (पान ४ वर)

## शहाद्यात औद्यो.वसाहत स्थापन करणार उद्योग मंत्री उदय सामंत यांची माहिती

**मुंबई, दि.१९- नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहादा येथे औद्योगिक वसाहत स्थापन करून या भागात औद्योगिक गुंतवणूक व उद्योग सुरू करण्यासाठी शासन सकारात्मक आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.**

नंदुरबार जिल्ह्यातील औद्योगीकरणा बाबत सदस्य राजेश पाडवी यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य योगेश सागर यांनी सहभाग घेतला. मंत्री सामंत म्हणाले, नंदुरबार जिल्ह्यात औद्योगीकरण वाढवून तेथील स्थलांतर कमी करण्यासाठी शासन प्रयतक्शील आहे. शेजारच्या गुजरात राज्यातील सुरत येथील वस्त्र उद्योग नंदुरबार जिल्ह्यात येत आहे. नंदुरबार जिल्ह्यात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले वस्त्रोद्योगाचे प्रकल्प आले आहेत. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात औद्योगीकरण निश्चितच वाढणार आहे. नंदुरबार (पान ४ वर)

## दुचाकी अपघातात मृत पावलेल्या लोणखेडा येथील जवानावर शासकीय इतमामात झाले अंत्यसंस्कार



**शहादा, दि.१९ (का.प्र.)- शिंदखेडा नजीक मंगळवारी झालेल्या मोटरसायकल अपघातात मृत्यू पावलेल्या भारतीय सैन्य दलातील सैनिक नंदलाल शिरसाठ (पाटील) यांच्यावर लोणखेडा येथील अमरधाम मध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.**

याबाबत अधिक वृत्त असे, भारतीय सैन्य दलात नोकरीस असलेला लोणखेडा येथील युवा सैनिक नंदलाल यशवंत शिरसाठ नातेवाईकांकडील लग्न समारंभासाठी रजेवर आला होता. मंगळवारी दुपारी आपल्याकडील मोटरसायकलने अमळनेर येथे लग्नासाठी जात असतांना शिंदखेडा नजीक झालेल्या अपघातात त्याच्या दुर्दैवी मृत्यू झाला होता. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर त्याच्यावर आज सकाळी लोणखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. (पान ४ वर)





## धुळे सीए शाखेच्या बँक लेखा परीक्षण सेमिनारला प्रतिसाद

**धुळे दि.१९- इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिल अंतर्गत कार्यरत धुळे शाखेच्या वतीने बँक शाखा लेखापरीक्षण या विषयावर एकदिवसीय सेमिनारचे नुकतेच आयोजन शाखेत करण्यात आले. या कार्यक्रमाला चार्टर्ड अकाउंटंट्स व संबंधित व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

या सेमिनारमध्ये तज्ज्ञ वक्त्यांनी महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. सीए हितेश पोमल (अहमदाबाद) यांनी संबधित नियम, प्रगती कर्जे आणि या संदर्भात जारी नवीन सुधारणांचा मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेबद्दल सखोल माहिती दिली. सीए श्वेता जैन (मुंबई) यांनी लेखापरीक्षण नियोजन आणि लॉंग फॉर्म ऑडिट रिपोर्ट यावर मार्गदर्शन करून प्रभावी लेखापरीक्षण प्रक्रियेवर भर दिला. सीए राहुल धारणे (लातूर) यांनी बँक शाखा लेखापरीक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्स च्या वापरा विषयी सविस्तर माहिती दिली आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या भूमिकेवर प्रकाश टाकला. सेमिनारच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले, जिथे सहभागी चार्टर्ड अकाउंटंट्सनी आपल्या शंका उपस्थित केल्या आणि तज्ज्ञांनी त्याचे निरसन केले. धुळे सीए शाखा भविष्यातही अशा प्रकारचे शैक्षणिक आणि व्यावसायिक ज्ञानवर्धक कार्यक्रम आयोजित करून चार्टर्ड अकाउंटंट्सना अद्ययावत माहिती व कौशल्ये प्रदान करण्यासाठी (पान ४ वर)

## मनपाने करवाढ करतांना वीस टक्केच करावी; करनकाळ यांची मागणी

**धुळे, दि.१९- महापालिकेने मालमत्ता कर ३६ वरुन ३० टक्के न करता २० टक्के करावा, अशी मागणी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस युवराज करनकाळ यांनी आयुक्त तथा प्रशासक अनिता दगडे-पाटील यांच्याकडे केली आहे.**



यासंदर्भात करनकाळ यांनी आयुक्तांची आज प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. महापालिकेने ३१ मार्चपर्यंत शास्तीमाफी योजना जाहीर करुन धुळेकरांना दिलासा दिला आहे. मात्र, हा दिलासा क्षणीक ठरणार आहे. कारण शास्तीमाफी देवून आपली तिजोरी भरण्याचा मनपाचा प्रयत्न आहे. त्यानंतर मात्र, १ एप्रिलपासून मालमत्ता करात ३० टक्के वाढ केली जाणार आहे. त्याची बिले तयार करण्याचे कामही मनपाने आरंभले आहे. करवाढ ही केवळ २० टक्के करावी, आयुक्त यांना अधिकार आहे, त्या अधिकाराचा वापर करायला हवा, महापालिकेने १८ ते ३१ मार्च या कालावधीसाठी शास्तीमाफीची योजना जाहीर केली आहे. शास्तीमाफीमुळे धुळेकरांना आपण मोठा दिलासा दिला, असे भासविले जात आहे. दहा वर्षापुर्वी नगरसेवकांनी मालमत्ता करात ३६ टक्के करवाढ करण्याचा ठराव केला होता. त्यावेळी मनपा प्रशासनाने सदर ठराव शासनाकडे पाठविला प्रशासनाने करवाढीची अंमलबजावणी करण्याच्या हालचाली सुरु केल्यानंतर त्यास जनतेतूनही तीव्र विरोध झाला. त्यानंतर गेल्या वर्ष-दीड वर्षापुर्वी मनपाच्या स्थायी समितीच्या सभेत हा विषय आला. त्यावेळी देखील सत्ताधा-यांनी सदर ठराव रद्द केला नाही. अन्यथा शासनाला करवाढ रद्द करणे भाग पडले असते. मात्र, आता यात आपण काहीही करू शकत नाही, करवाढ करताना १६ ते १७ टक्के केली जात होती. परंतु आता थेट ३६ टक्के करवाढ करण्यात आली आहे. असे न करता करवाढ ही २० टक्के पर्यंत करावी. दरवर्षी दोन याच टक्के वाढविले असते तर नागरिकांनी कोणतीही हरकत घेतली नत्तती, परंतु आता ज्याला १०० रुपये मालमाता (पान ४ वर)



## गौण खनिजाची अवैध वाहतूक ट्रॅक्टर जप्त; एक जण ताब्यात

**पिंपळनेर, दि.१९ (प्रतिनिधी) - साक्री तालुक्यातील पिंपळनेर-वनक्षेत्रातील मौजे.दिघावे कक्ष-क्र.२२६ मधील राखीव वन-क्षेत्रातील नाल्यामधून मानिक अभिमन शेवाळे, वय वर्ष ४२ रा.दिघावे त्याच्या मालकीचे कुबोटा कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र.एमएच ४१/२३९८ ट्रॉली मध्ये विनापरवाना माती मिश्रीत वाळु उत्खनन करुन व भरुन वाहतुक करीत असतांना वनकर्मचारी यांना मिळुन आला.**

त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा उत्खनन वाहतुक परवाना नसल्याने सदर इसमास वनविभागाने ताब्यात घेतले तसेच ट्रॅक्टर व ट्रॉली मालासह जप्त करण्यात आला. सदर मुद्देमालाची अंदाजे किंमत ५ लाख पाच हजार इतकी आहे. त्याच्यावर भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६ (१) ५२ तसेच कलम ६५ अन्वये वनरक्षक दिघावे यांच्याकडील वनगुन्हा क्र. ०-०२/२०२५ दि.१७मार्च अन्वये गुन्हा नोंद करुन सदर इसमास मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय, साक्री-२ येथे हजर केले असता दोन दिवसाची वनकोठडी दिली असुन पुढील तपास आर.व्ही.चौरे वनपाल दिघाचे करत आहेत.

सदरची कार्यवाही निनु वनसंरक्षक धुळे, सिंग सोमराज (प्रादे) नितीनकुमार (पान ४ वर)

## सर्व माध्यमिक शाळांना थकीत देयके तातडीने द्या! शिक्षक परिषदेचे जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

**शिंदखेडा, दि.१९ (प्रतिनिधी)- धुळे जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळानी थकित देयके मंजुरीसाठी वेतन पथक कार्यालयात सादर केली होती. परंतू आजपर्यंत थकित वेतन देयकाबाबत कोणतीही माहिती मिळत नाही. तरी थकीत देयके व एनपीएस हप्ते त्वरित जमा करावेत, अशी मागणी शिक्षक परिषदेने निवेदनाद्वारे केली आहे.**



निवेदनात पुढे म्हटले आहे की, इतर जिल्ह्यातील थकीत वेतन देयके बाबत त्रुटी असल्यास संबंधित संबंधित शाळांना त्रुटी पूर्ण करून सदर देयके पुन्हा सादर करण्याबाबत सूचना देण्यात आले असून आपल्या जिल्ह्यात अद्याप मंजूर ना मंजूर किंवा त्रुटी पूर्ण करण्याबाबत कुठलेही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे थकित देयके मार्च पुर्वी जर मंजुर झाली नाही तर संपुर्ण जिल्हयातील शिक्षक थकित देयकापासुन वंचित राहतील. जानेवारी महिन्यातील प्राप्त आदेशानुसार थकीत वेतन देयके सादर केल्यानंतर फेब्रुवारी व मार्च महिन्यात थकीत वेतन देयके सादर करण्याबाबत अद्याप कुठलेही आदेश प्राप्त झाले नसून या कालावधीत तयार झालेली थकीत देयके सादर न झाल्यास संबंधित कर्मचारी थकीत देयकापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने (पान ४ वर)

### उपसभापती डॉ.गोऱ्हेंवरील
## विश्वासदर्शक प्रस्ताव मंजूर

मुंबई दि.१९- विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्यावर ही विधान परिषद पूर्ण विश्वास व्यक्त करीत आहे, अशा आशयाचा विश्वासदर्शक प्रस्ताव भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकर यांनी आज विधान परिषदेत मांडला. हा प्रस्ताव सभागृहाने आवाजी मतदानाने मंजूर केला. आ.दरेकर यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्यावर ही विधानपरिषद पूर्ण विश्वास व्यक्त करत आहे, असा एका ओळीचा प्रस्ताव सभागृहात मांडला. विधान परिषदेचे सभापती यांनी हा प्रस्ताव मतास टाकला व सभागृहाने आवाजी मतदानाने तो मंजूर केल्यानंतर प्रस्ताव मंजूर झाल्याचे सभापती यांनी जाहीर केले.

## भगवान महावीर स्वामी जन्म महोत्सव तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन

**धुळे, दि.१९- शहरात भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव- २०२५ चे अध्यक्ष दिनेश सुरजमल जैन सूर्या व वरूण जैन यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसीय कार्यक्रम घेण्यात येत आहे. यासाठी जैन समाजाच्या चारही संप्रदायाच्या अध्यक्षांसह संपूर्ण समाजाच्या सहकार्याने सर्व कार्यक्रमांचे नियोजन केले जात आहे.**

कार्यक्रमांचे विशेष लक्ष मंगळवार दि. ८ एप्रिल रोजी सायंकाळी साडे सहा वाजेपासून भगवान महावीर स्वामी यांच्यावर समाजातील ५ ते १८ वयोगटातील अविवाहित मुला-मुलींकरिता सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले आहे व बुधवार दि.९ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसहा वाजेपासून भगवान महावीर स्वामी यांच्यावर समाजातील वर्षापुढील श्रावक व श्राविकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले आहे. दि. ८ व ९ रोजी होणारे कार्यक्रम हिरे मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे ठेवण्यात आले आहे. तसेच मंगळवार दि. ९ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजेपासून विविध ठिकाणी अन्नदान, भंडाराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच गुरुवार (पान ४ वर)

## सव्वा कोटींची फसवणूक करणाऱ्या बँक व्यवस्थापकासह त्याच्या पत्नीवर गुन्हा

**धुळे, दि.१९- शहरतील एच.डी.एफ.सी. बँकेच्या व्यवस्थापक पदावर कार्यरत असतांना अंकुर जैन यांनी दिव्य अंकुर कन्सलटंन्सी या फर्मच्या माध्यमातून वेगवेगळ्या म्युचलफंड, शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केल्यास दरमहा पंधरा टक्के नफा काढून देण्याचे प्रलोभन दाखवून एक कोटी तीस लाखांची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी अंकुर जैन व त्याची पत्नी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**


विद्याराम भुराराम पटेल यांनी दि. १८ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, अंकुर पारसमल जैन बोथरा हा शहरातील एच.डी.एफ.सी. बँकेत व्यवस्थापक पदावर काम करत असतांना पदाचा गैरवापर करत पत्नीच्या संगनमताने नियोजनबध्द पध्दतीने दिव्य अंकुर कन्सलटन्सी फर्मद्वारे वेगवेगळ्या म्युचलफंड व शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केल्यास पंधरा टक्के नफा काढुन देण्याचे अमिष दाखवले. वियाराम भराराम पटेल यांच्याकडून जैन दाम्पत्याने पंच्याहत्तर लाख रोख व एकोणसाठ लाख धनादेशाच्या माध्यमातून एकुण एक कोटी चौतीस लाख (पान ४ वर)

| १९ रोजा २० | |
|---|---|
| २० मार्च इफ्तार ६.४४ | २१ मार्च सहेरी ५.१४ |

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -81,500 रु.+3% GST
सोने- 24 K -89,000 रु.+3% GST
चांदी- 1,00500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## नंदुरबार जिल्ह्यात ऑनलाईन चिमणी गणना अभियान नागरिकांनी सहभागी होण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- चिमण्यांचे पर्यावरणीय संतुलनात महत्त्व लक्षात घेता, दरवर्षी २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस साजरा केला जातो. या विशेष दिनाच्या निमित्ताने, नंदुरबार जिल्हा प्रशासन व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या वतीने ऑनलाईन चिमणी गणना २०२५ अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील चिमण्यांची संख्या नोंदवून चिमणी संवर्धन मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. यासाठी** https://forms.gle/JN4g615cYApyMkj89 **या लिंकवर जाऊन चिमण्यांची माहिती भरण्याचे आवाहन**





**जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांनी केले आहे.**

गेल्या काही वर्षांमध्ये वाढते शहरीकरण, रासायनिक कीटकनाशकांचा वापर, मोबाईल टॉवर्समधून निघणारे किरणोत्सर्ग यामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने घटली आहे. या पार्श्वभूमीवर, चिमण्यांचे संरक्षण करण्यासाठी काही महत्त्वाचे उपाय हे प्रत्येक नागरिकांनी अवलंबले पाहिजेत. घराच्या अंगणात किंवा गच्चीवर चिमण्यांसाठी धान्य व स्वच्छ पाणी ठेवणे. झाडांची लागवड करून चिमण्यांना सुरक्षित घरटी उपलब्ध करून देणे. चिमण्यांच्या संवर्धनासाठी समाजात जागृती निर्माण करणे. चिमणी गणनेत सहभागी व्हा आणि निसर्ग संरक्षणात योगदान द्या. नंदुरबार जिल्ह्यातील निसर्गप्रेमी, (पान ४ वर)

## निर्धारीत वेळेपेक्षा कमी वेळेत प्रश्न सोडविले; दोघांविरोधात गुन्हा दाखल

**धुळे, दि.१९- देवपूर नकाणे रोड नेताजी ग्राऊंड लगत असलेल्या भारती मल्टीपर्पज येथे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील दोन विद्यार्थीनींनी तांत्रिकदृष्ट्या लागणाऱ्या वेळेपेक्षा कमी वेळेत प्रश्नांची अधिक वेगात सोडवणुक केली. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

जिल्हा सहायुक्त नगर विकास शाखेतील अभिजीत मिलींद बाविस्कर यांनी दि.१८ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, ता.जि. छत्रपती संभाजी नगर लाकडवाडी पोस्ट खेडेगाव येथील पुजा खुशालसिंग गुमलाडू व याच जिल्ह्यातील गंगापूर तालुका एक बुर्जी वाघलगाव येथील आकांक्षा संतोष बिघोत या दोघांनी दि. २६ व २७ ऑक्टोबर २०२४ रोजी या दोन दिवशी परिक्षा दिल्या. टी.एस.सी. कंपनीने सादर केलेल्या अहवाला नुसार दोन्हीही महिला परिक्षार्थीनी अवघड प्रश्नांना तांत्रिक अपेक्षेपेक्षा लागणारा वेळ लक्षात घेता तुलनेने कमी वेळेत या प्रश्नांची अधिक वेगात सोडवणुक केली. हे वर्तन संशयास्पद असल्याने उमेदवारांनी गैरप्रकार करून विद्यार्थ्यांची फसवणुक केली. या प्रकरणी दोन्ही महिला परिक्षार्थीवर पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनला फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आपला महाराष्ट्र

## महिलांसाठी न्यायालये : काही प्रश्न

आमच्या देशात महिलांसाठी न्यायाची गरज मोठ्या प्रमाणावर असते. परंतु त्यांच्यावर अन्यायच अधिक होतो. अशावेळी सरकारचा एखादा विभाग जर गावागावात महिलांसाठी न्यायालय सुरू करणे आणि ते चालू करणे यासाठी पुढाकार घेत असेल तर ती बाब निश्चितच सुखावह म्हटली पाहिजे. केंद्र सरकारने अशा प्रकारच्या न्यायालयांची योजना हाती घेतलेली आहे. घरगुती हिंसाचार, हुंडा आदी सारखी मागणी, विविध कारणांनी होत असलेला सासुरवास आणि मुलांच्या सुरक्षेतते संबंधीच्या घटनांची नोंद घेण्यासाठी किंवा योग्य ती कारवाई करण्यासाठी अशा न्यायालयांचा विस्तार केला जात आहे. वरवर बघता ही बाब महिलांसाठी आवश्यक आणि प्रगतिशील पाऊल म्हणून चर्चेत येऊ शकते. परंतु त्याबाबत काही प्रश्नही निर्माण होऊ शकतात. ही न्यायालये किती प्रभावी ठरू शकतील, त्यांच्या कुठल्या मर्यादा असतील, शिवाय त्यांचा सामाजिक आणि आर्थिक प्रभाव बघितल्याशिवाय त्यांचा विस्तार फक्त एक उपचार ठरू शकतो. मात्र ज्याप्रमाणे लाडकी बहीण योजना लागू करून मतांची बेगमी काही राजकीय पक्षांनी करून ठेवली त्याप्रमाणेच महिलांच्या संदर्भातील न्यायालये सुरू करून आणखी एक वोट बँक तयार केली जाईल असे दिसते. डिसेंबर २०२३ मध्ये आसाम आणि जम्मू कश्मीर राज्यातील प्रत्येकी ५० ग्रामपंचायतीत पायलट योजना म्हणून लागू करण्यात आलेली महिला न्यायालय योजना ग्रामपंचायत स्तरावर एक पर्यायी तक्रार निवारण केंद्र म्हणून उपयोगी ठरली आहे. ही योजना घरगुती कलह आणि हिंसाचार यासारख्या प्रकरणात उपयोगी ठरली आहे. यात ग्रामपंचायत द्वारा नियुक्त केलेले सात ते अकरा सदस्य असतात. त्यांना न्याय सखी असे म्हटले आहे. ही योजना आगामी काळात देशभर लागू करण्यात येणार आहे. महिलांसाठी न्यायालय किंवा गाव स्तरावर न्यायव्यवस्था हा आवश्यक प्रयतक्रातील एक भाग म्हटला पाहिजे. महिलांना न्यायप्रदान करण्याच्या दृष्टीने अशा काही बाबी आवश्यक असतात. त्याप्रमाणे या योजनेकडे बघितले जाईल. वरकरणी ही योजना कितीही फलदायी किंवा आदर्श वाटत असली तरी आमच्या देशातील किंवा समाजातील पितृसत्ताक कुटुंब पद्धती सगळ्यात मोठा अडसर आहे. ही जी काही रचना आहे त्या रचनेला ही न्यायालये आव्हान देऊ शकतील का? जर या न्यायालयांचे संचालन पुरुषप्रधान रचनेप्रमाणेच असेल तर महिलांना न्याय मिळणे किंवा त्यांच्या समस्यांवर तोडगा काढणे अशक्य होईल. यात असेही होऊ शकते की महिलांना न्याय देण्याऐवजी त्यांना प्रत्येक प्रकरणात समझोता करण्यास बाध्य केले जाऊ शकते. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की कौटुंबिक हिंसाचाराच्या संदर्भातील किंवा त्यांच्या शोषणासंदर्भातील प्रकरणात बहुदा महिलांनाच कुटुंब वाचविण्याचा सल्ला दिला जातो. त्यांनी सोशिक व्हावे असेच सांगितले जाते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिगत समस्या सुटण्याऐवजी अधिक गंभीर होतात. म्हणूनच खास महिलांसाठी चालवण्यात येणाऱ्या न्यायालयांकडून रचनात्मक बदल होईल का हा प्रश्न आहे. खरे तर महिलांना सक्षम बनविण्यासाठी किंवा त्यांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य, सामाजिक स्वायत्तता बहाल करणे देखील गरजेचे आहे. जोपर्यंत महिलांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती मजबूत होत नाही तोपर्यंत अशा प्रकारची महिला न्यायालये अस्थायी स्वरूपाचे समाधान प्रदान करू शकतील. ती पूर्ण समाधान देऊ शकणार नाहीत. या न्यायालयांच्या समोर महिलांशी जुळलेल्या कायदेशीर बाबी तसेच न्यायप्रक्रियेतील जटिल समस्या लक्षात घेता सांस्कृतिक आव्हाने भविष्यात उभी असतील. कारण भारतात आजही महिलांच्या अधिकारांकडे संशयाने बघितले जाते. कधी कधी हास्यास्पद ठरविले जाते. पितृसत्ताक कुटुंब पद्धती किंवा पुरुषप्रधान संस्कृतीचे समर्थन करणारा फार मोठा वर्ग आपल्याकडे आहे. कायदे आणि पोलीस प्रशासनातही तो मौजूद असून ती मानसिकता महिलांना न्यायापर्यंत जाण्यापासून नेहमीच रोखत आलेली आहे. अशा स्थितीत महिलांना कितपत न्याय मिळेल याबाबत शंका आहे.

खोलवर बघितले असता असे लक्षात येते की महिलांवर होणारे अन्याय अत्याचार आर्थिक असमानतेशी संबंधित आहेत. वर्गीय विभाजनाची भूमिका देखील यात आहे. घरगुती हिंसाचार, लैंगिक छळ आणि हत्या यासारखे गुन्हे केवळ लैंगिक भेदभावाशी संबंधित नसून भांडवलदारी रचनेने पोसलेल्या आर्थिक आणि सामाजिक असमानतेशी सुद्धा जुळलेले आहेत. म्हणूनच स्त्रियांच्या सर्वांगीण सशक्तिकरणाची गरज आधी आहे. जोपर्यंत स्त्री मजबूत होत नाही तोपर्यंत पुरुषप्रधान संस्कृतीच्या समाजात तिचे स्थान दुय्यमच असणार आहे. टक्केवारीने काही मोजक्या महिला लोकसंख्येच्या तुलनेत याबाबत पुढारलेल्या असल्या तरी खूप मोठा वर्ग अजून दुय्यम स्थितीत जगतो. हे वास्तव आहे. महिलांसाठी येणारी न्यायालये जरूर एक न्यायमंच उभा करू शकतील. परंतु त्यांचे आर्थिक स्वावलंबनाचे प्रश्न मार्गी लावतील काय या प्रश्नाबाबत सध्याच काही सांगता येणार नाही. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा यातून अधोरेखित होणार आहे तो म्हणजे सर्व वर्गातील महिला तिथपर्यंत पोहोचणार आहेत काय? या प्रश्नाचे उत्तर देखील अधांतरी आहे. आधीच शहरी गरीब वस्तीतील आणि खेड्यातील महिला न्यायव्यवस्थेपासून दूर आहेत. त्या प्रवाहात फार कमी महिला अशा आहेत की त्यांना स्थान आहे. बाकीच्यांना ते स्थान नाही. त्यांची जगण्याची प्राथमिकता अन्न वस्त्र निवारा असून स्वत:साठी आणि मुलांसाठी व्यवस्था अशी आहे. त्या परिप्रेक्ष्यात महिला न्यायालयाचे मूल्यांकन करावे लागेल. अन्यथा एक आणखी व्यवस्थेतील उपचार असेच त्याचे स्वरूप होईल. राज्या राज्यातील कायदेशीर व्यवस्था बहुदा ताकदवान आणि श्रीमंती लोकांचेच रक्षण करीत आलेली आहे. महाराष्ट्र कितीही पुरोगामी म्हटला जात असला तरी महाराष्ट्रात देखील हीच अवस्था आहे. म्हणून राज्य सरकारे या महिला विषयक न्यायालयांचे नियंत्रण करणार असतील आणि त्यात लोकांची भागीदारी नसेल तर ही योजना देखील ताकदवान लोकांच्या सुरक्षिततेसाठीच एक साधन म्हणून पुढे येईल.

म्हणून तात्विक दृष्ट्या अशा उपक्रमांची आवश्यकता असली आणि प्रगतिशील पाऊल म्हणून त्याकडे बघता येत असले तरी त्याची व्यवहाराशी सांगड घालणे आवश्यक वाटते. न्यायाचे स्वरूप काय असेल, केवळ कायदेशीर प्रक्रिये पर्यंतच ती मर्यादित असेल काय ? की सामाजिक आर्थिक परिवर्तनापर्यंत ती व्यवस्था जोडली जाईल यावर त्याचे यशापयश अवलंबून आहे. न्याय केवळ कायदेशीर समाधानाचा एक मुद्दा नसून सामाजिक पुनर्रचनेची सुद्धा प्रक्रिया आहे. हे या क्षेत्रातील तज्ज्ञांनी लक्षात घेतले पाहिजे. आजची राजकीय व्यवस्था या पद्धतीने या प्रश्नाकडे बघणारी नाही. त्यामुळे ही योजना कितीही चांगली वाटत असली तरी जुनाट संस्कृतीच्या जोखाडात ज्यांनी आपली बुद्धी गहाण ठेवली आहे त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा करता येणार नाही. मुळातच महिलांना दुय्यम दर्जा कायम असावा अशा मानसिकतेचे लोक राज्यकारभारी आहेत. म्हणून अशा योजना यशस्वी होत नाहीत. अशा साधनांकडे तत्कालिक किंवा तात्पुरत्या समाधानाचे साधन म्हणून न बघता व्यापक सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून बघणारा वर्ग हवा आहे. इतिहासाचे पुनर्लेखन करण्याच्या नावाखाली ज्याप्रमाणे मनुवादी संस्कृतीचे समर्थन करणाऱ्या २१ लोकांची समिती तयार करण्यात आलेली आहे त्यानुसार महिलां साठी उदयाला येणारी न्यायव्यवस्था अशाच लोकांच्या हातात असेल तर त्याचे काय होईल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. एकूणच न्यायव्यवस्थेला पितृसत्ताक व्यवस्थेतून बाहेर काढण्याची गरज आहे. नंतर जे त्याचे स्वरूप असेल त्या चौकटीत महिलांच्या अधिकारांची निश्चितता करता येईल. तो दिवस किंवा ती व्यवस्था या देशात येईल का ?

## नवापूर शहरात शिवजयंती उत्साहात साजरी भव्य शोभायात्रा; शिव तांडव नृत्याने वेधले लक्ष




**नवापूर, दि.१९ (प्रतिनिधी)- शहरात शिवजयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन शिवजयंती उत्सव समितीने केले होते. संध्याकाळी जुनी महादेव गल्ली येथुन भव्य मिरवणूकीला प्रारंभ झाला. कार्यक्रमाचा सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन डोकारे आदिवासी सहकारी साखर कारखाना चेअरमन भरत गावीत, तहसिलदार दत्तात्रय जाधव, उपनिरीक्षक भाऊसाहेब लांडगे, माजी नगराध्यक्ष गिरीष गावीत, माजी विरोधी पक्षनेता नरेंद्र नगराळे व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी शिवसेना जिल्हा उपप्रमुख हसमुख पाटील, सेवा निवृत पोलिस निरीक्षक अजय वसावे, माजी नगरसेवक विश्वास बडोगे, फारुक शहा, विशाल सागळे, माजी नगरसेविका सौ अरुना पाटील, मंगला सैन, उत्सव समितीचे अध्यक्ष विजय सैन, शिवसेना शहर प्रमुख अनिल वारुडे, हेमंत जाधव, किशन शिरसाठ, राणा राजपूत समाजाचे अध्यक्ष रामकृष्ण पाटील, जेष्ठ नागरीक यशवंत पाटील, दर्शन दिपक पाटील, डॉ.चंद्रशेखर पाटील, डॉ.अमित मावची, अजय गावीत, नितु शर्मा, दिनेश चौधरी, गणेश वडनेरे, दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष सुधिर निकम, मंगेश येवले, निलेश पाटील, हिमाशु पाटील, अंबादास आतारकर, निलेश प्रजापत आदींनी पुजन केले. शोभायात्रेत शिव तांडव नृत्य व विर हनुमान सजीव देखावा सादर करण्यात आला. शोभायात्रेची सुरुवात ढोल ताशाचा गजरात जुन्या महादेव मंदीरा पासुन सुरुवात करण्यात आली. मिरवणूक पाहण्यासाठी नागरीकांनी एकच गर्दी केली होती. शोभायात्रा गुजर गल्ली, श्रीराम मंदीर, सरदार चौक, लाईट बाजार, शिवाजी रोड फिरुन जुन्या महादेव गल्ली येथे येऊन सांगता करण्यात आली. सुत्रसंचलन प्रशात पाटील यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे अध्यक्ष विजय सैन, उपाध्यक्ष लखन गोसावी, संदिप पाटील, रंजु अग्रवाल, संजय सोनी, अजय गावीत, प्रताप ढोले, अनिल वारुडे, चंदु चौधरी, रुपेश पाटील, जितेंद्र अहिरे, राजेश जयस्वाल, हरीष दर्जी, मनोहर नगराळे, रामु गिरासे, दर्पण पाटील, प्रविन ब्रम्हे, प्रशात ठाकरे, अनिल दुसाने, दिनेश भोई, भट्टु पाटील, मयुर पाटील यासह शहरातील सर्व गणेश मंडळाचे सदस्य यांनी परीश्रम घेतले.

## धुळ्यात एकविस एप्रिलला प्रादेशिक सेनेत माजी सैनिकांसाठी पंचावन्न पदांकरीता भरतीचे आयोजन

**धुळे, दि.१९- १३६ पैदल वाहिनी प्रादेशिक सेनेतील पर्यावरण महार बटालियनमध्ये माजी सैनिक तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालय, राज्य शासनाच्या (वनविभाग) मधील सेवानिवृत्त महिलांसाठी २१ ते २३ एप्रिल, २०२५ या कालावधीत एसआरपीएफ कॅम्प मैदान, धुळे येथे सैन्यभरती आयोजित केली आहे. या भरतीत पात्र उमेदवारांनी २१ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ५.३० वाजता धुळे येथील एसआरपीएफ मैदान येथे शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहावे. असे आवाहन लेफ्टनंट कंमाडर प्रभू अमित सी यांनी एका पत्रकान्वये केले आहे.**

कॉन्स्टेबल जनरल डयूटी ४४ पदे फक्त महाराष्ट्रातील माजी सैनिक तसेच सेवानिवृत्त महिला वन पर्यावरण मंत्रालय केंद्र शासन तसेच वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेसाठी ही भरती होईल. लिपिक ६ पदे, स्वयंपाकी १, न्हावी १, मेस किपर १, वेटर १, वेल्डर ब्लॅकस्मित १ या पदांसाठी संपूर्ण भारतातील माजी क्लार्क तसेच माजी सैनिक ट्रेड्समन अर्ज करु शकतात.

भरतीसाठी पात्रता : माजी सैनिक आणि सेवानिवृत्त महिलांची वयोमर्यादा ५० वर्षांपेक्षा जास्त नसावी. माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

वैद्यकीय श्रेणी : चारित्र्य, डिस्चार्ज बुकनुसार अनुकरणीय खूप चांगले असावे. माजी सैनिक आणि पर्यावरण मंत्रालय आणि राज्य वन विभागातील माजी महिला कर्मचारी, केंद्र आणि राज्य शासनाच्या वन विभागामध्ये २० वर्षांच्या सेवेसह स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेले असावे. माजी सैनिकांसाठी उंची १६० से.मी. माजी महिला कर्मचारी १५० से.मी असावे. माजी सैनिकांचे वजन ५० किलो तर माजी महिला कर्मचाऱ्यांचे वजन ४२ किलो असावे.

शारीरिक चाचणी फक्त पुरुषांसाठी १ मैल दौड, ८ ते ९ फुट खड्डा, बीम आणि बॅलन्स वॉक पार करावे लागतील. भरती प्रक्रिया करणारे अधिकाऱ्यांमार्फत मुलाखत आणि वैद्यकीय तपासणी करून महिलांची भरती केली जाईल. भरतीसाठी पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ), डिस्चार्ज बुक, ईएसएम आयडेन कार्ड, पासपोर्ट आकाराचे ८ छायाचित्र, शिक्षण प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र आणि आधारकार्ड आणावेत.

प्रादेशिक सेना पर्यावरण महार बटालियनमध्ये कोणत्याही प्रकारचे सेवानिवृत्ती वेतन मिळणार नाही. प्रादेशिक आर्मी पर्यावरण महार बटालियनमध्ये वयाच्या ५० वर्षापर्यंत काम करू शकतात. ही मोफत भरती सेवा आहे. या भरतीसाठी कोणाला लाच देऊ नये. मध्यस्थांपासून दूर रहावे. जर उमेदवार लाच देताना पकडला गेला तर त्याची निवड रद्द केली जाईल. असेही लेफ्टनंट कंमाडर प्रभू अमित सी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.





## वलवाडीतील विद्याधन स्कूलमध्ये पारितोषिक समारंभ उत्साहात संपन्न

**धुळे, दि.१९- वलवाडी येथील शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक समारंभ संतोष कृष्णाजी पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.**

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के.बी.पाटील होते. संस्थेच्या अध्यक्षा सौ.शारदा पाटील यांचे प्रत्येक विद्यार्थ्यावर वयक्तिक लक्ष केंद्रित असतं म्हणून विद्यार्थी सर्व गुण संपन्न घडत आहेत. पालक प्रतिनिधी म्हणून आपले विचार व्यक्त करतांना प्रा.प्रविण पाटील म्हणाले की शाळेची प्रगती गुणी शिक्षण वर्ग तसेच व्यस्थापनच नियोजन यामुळे शाळेतील मूल बाह्य जिनियस सारख्या परीक्षेत महाराष्ट्रात नावलौकिक करीत आहेत. विद्याधन स्कूल वर्षभर विविध कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना गुणवंत करीत आहेत. कार्यक्रमास संस्थेचे सचिव हर्षल पाटील, संचालिका डॉ.जागृती पाटील, कार्यक्रमांचे मोहिनी पाटील यांनी सूत्र संचलन केले. आभार स्नेहल पवार यांनी मानले.कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.



## डॉ.आगीवाल इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

**धुळे, दि.१९- धुळे एज्युकेशन सोसायटीचे डॉ. गुलाबचंद रूपचंद आगीवाल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.लता शहा होत्या. सूत्रसंचालन उपशिक्षिका सौ. वैशाली अहिरराव यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सी.व्ही. रमन, डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच इ.४ थी ते ९ वी च्या काही विदयार्थ्यांनी विविध औषधी वनस्पतीचे फायदे सांगितले तसेच शाळेतील उपशिक्षिका चारू लुल्ला यांनी विविध औषधी वनस्पतीचे महत्व व फायदे सांगून रोजच्या आहारात देखील काही वनस्पतीचा वापर करता येतो असे देखील सांगितले. मुख्याध्यापिका सौ. शहा यांनी विजेची बचत, पाणी बचत, टाकाऊतून टिकाऊ, तसेच इलेक्ट्रिक वाहन वापरून पैशांची बचत किती आणि कशी करता येईल हे सांगून दैनंदिन जीवनात पैशाचा वापर कमीत कमी कसा करता येईल या मुद्यावर प्रकाश टाकत उदाहरणांचे दाखले देऊन उपस्थितांना पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील उपशिक्षिका चारू लुल्ला, सौ.प्रणाली नाचरे, सोज्वळ नाचरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## एस.व्ही.के.एम.अभियांत्रिकी महाविद्यालयात आयआयटी बॉम्बेच्या सहकार्याने आर्डिनो प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**धुळे, दि.१९- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचालित इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे माहिती तंत्रज्ञान विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील शिक्षक विकास कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.**



हा कार्यक्रम आय.आय.टी. बॉम्बेच्या स्पोकन ट्युटोरियल प्रकल्पाच्या सहकार्याने व इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.या दरम्यान ऑनलाइन व प्रत्यक्ष प्रशिक्षण घेण्यात आले. आय.आय.टी. बॉम्बेच्या स्पोकन ट्युटोरियलद्वारे स्व-गतीने शिकण्याच्या माध्यमातून ऑनलाइन सत्रे पार पडली. प्रत्यक्ष हाताळणी सत्र कॅम्पसमध्ये पार पडले. प्रशिक्षक श्रीधर दुदाम (प्रमुख, स्मार्ट लॉजिक टेक्नॉलॉजी, पुणे) यांनी आर्डिनो च्या व्यावहारिक उपयोगांवर सखोल मार्गदर्शन केले. सहभागी शिक्षकांनी आर्डिनो हार्डवेअर व कोडिंगचे प्रात्यक्षिक करून घेतले. विविध मिनी-प्रोजेक्ट्स आणि प्रश्नोत्तरे सत्रांमुळे सहभागींसाठी उपयुक्त ज्ञानसत्र ठरले.सर्व सहभागी शिक्षकांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आय.आय.टी. बॉम्बेच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांना विशेष प्रमाणपत्र देण्यात आले. विभागप्रमुख डॉ. भूषण चौधरी यांनी सांगितले की, या कार्यक्रमामुळे शिक्षकांचे तांत्रिक कौशल्य वाढले असून, त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या अध्यापन प्रक्रियेत होणार आहे.


प्राचार्य डॉ.निलेश साळुंके यांनी शिक्षकांनी घेतलेल्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले. प्रा.मंगेश बालपांडे व प्रा.नितीन धुतराज यांनी समन्वयक म्हणून काम पहिले. प्रा. भाग्यश्री ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले.

## लाखांचा ऐवज लंपास

धुळे, दि.१९- धुळे तालुक्यातील बुरझड येथील राहत्या घराचे कुलुप तोडून घरातील सोने, चांदीचे दागिने व एक लाखांची रोख रक्कम असा एकुण एक लाख एक्कावन्न हजार तीनशे पंच्च्याण्णव रूपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.




### शब्दकोडे क्रमांक.२११२



आडवे शब्द : १.पैसा ३.पराक्रम ६.नवीन कोरा ९. अर्धांगवायू ११.शंभर १२.इंग्रजीत-खूप खोल १५.संगीत सप्तकातील पहीला स्वर १७.होकार १९.आजारी २०.दैना २२.गावाचा महसूल गोळा करणारा अधिकारी २३.नाहीसा २४.मित्र २५.गायनाचा सराव २७.चतकोर,काठ २८. चामडी ३२.अंतर ३३.एखादया गोष्टीसाठी पिच्छा पुरवणे ३५.महान ३६.मंजिरी ३७.झोपडी ३९.बेवडा ४२.ओक्साबोक्शी केलेले रूदन ४४.कामोत्तेजक ४६.मरण देवता ४७.गुडगुडी ४८.मुस्लिम समाजातील एक पोटजात ४९.व्यंजनापासून बारा सर्वांच्या मिलाफाने तयार होणाऱ्या अक्षरांची मालिका ५२.स्वारी ५३.कवितेच्या अखेरीस उच्चारात जुळणारे शब्द ५४. अधिकारांची अंमलबजावणी करणारा उभे शब्द : १.पलीकडचे काठ २.कावळा ४.पत्ते ५.नाश ७.रांग ८.रिकामा १०.आळी १३.दुसऱ्यावर केलेले उपकार १४.समय १६.हिंदीत-मरण १८.उठाव २०.’.. मेरे साथी’एक हिंदी सिनेमा २१.किंतु २२.शोध २४.लुगडे २६. बर्फाळ प्रदेशात आढळणारा एक केसाळ प्राणी २७.एक फळभाजी २९.आक्षेप ३०.संधी ३१.मयुर ३२.परागंदा झालेला ३३.टीत-उलट लिहा ३४.अशोक कुमार यांचे सिने क्षेत्रातील टोपणनाव ३५.जरासा ३८.कडाक्याच्या थंडीत शरीराचा होणारा थरकाप ४०.करू-उलट लिहा ४१.दयेस पात्र असलेले ४३.डावखुरा ४५.एखादे कार्य करण्यासाठी केलेली हालचाल ४८.शेत ४९.बाकडा ५०.व्यय ५१.दर ५२.नेहमी

शब्दकोडे क्रमांक.२१११ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | हा | र | त | ज्ञ | | स | | सा | प | | का |
| वा | त | | र | | मं | ड | ई | | र | य | त |
| ज | | कु | बे | र | | क | | खो | का | | ळ |
| | ऐ | व | ज | | रां | | क | ल | | प्र | |
| स | त | त | | ना | ग | मो | डी | | आ | वे | ग |
| | बा | | पा | व | | ट | प | री | | श | र |
| भा | र | त | | रा | डा | | त्ता | | सी | | ज |
| गा | | सा | ह | स | | सा | | ए | | का | |
| का | ढा | | रा | | को | य | ता | | बो | क | ड |
| र | | वा | रे | मा | प | | र | व | का | | गा |
| | स | ह | | डी | | सा | ता | रा | | क | |
| ख | र | क | टा | | अ | क्ष | म्य | | ता | ली | म |






## पान १ वरुन

### औरंगजेब सध्याच्या घडीला सुसंगत नाही!

संघाला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने ही सभा होत आहे. यासंदर्भात माहिती देण्यासाठी संघाची पत्रकार परिषद झाली. यावेळी त्यांना महाराष्ट्रात गाजत असलेला औरंगजेब मुद्दा आणि हिंसाचाराबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. संघ मुख्यालयापासून काही अंतरावर हिंसाचार झाला आहे. तर आजच्या घडीला औरंगजेब सुसंगत आहे का? महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही म्हणाले आ-हेत की हा हल्ला पूर्वनियोजित होता. विश्व हिंदू परिषदेने आंदोलन केले, त्याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवकाची भूमिका काय आहे? असा प्रश्न राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सु-नील अंबेकर यांना विचारण्यात आला.विश्व हिंदू परिषदेचे वरिष्ठ पदाधिकारी गोविंद शेंडे म्हणाले, औरंगजेब सुसंगत विषय नाही, हे संघाने म्हटलेले आम्हाला मान्य आहे. पण, औरंगजेबाचे उदात्तीकरण करणे आणि त्याचे समर्थन करणे, हे आम्हाला मान्य नाही. त्याला आदर्श ठेवणे आम्हाला मान्य नाही. आमचे आंदोलन १७ तारखेला होते. ते संपलेले आहे. पुढची योजना आहे. हे ठरवण्यासाठी भरपूर वेळ आहे. ते ठरल्यानंतर आम्ही सरकारला सांगू, असे गोविंद शेंडे यांनी सांगितले.

### बाराशेहून अधिक संशयितांविरुद्ध गुन्हे

घटना घडली, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी सभागृहात दिली. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी करीत औरंगजेबच्या प्रतिकात्मक कबरीवर हिरव्या रंगाची चादर टाकून जाळली. त्यामुळे रविवारी दुपारच्या सुमारास महालच्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात आंदोलन झाले होते. त्यानंतर समाज माध्यमांवर विविध अफवा पसरल्या व सायंकाळी तरुणांच्या दोन गटांत संघर्ष झाला. काही समाजकंटकांनी या वादात प्रवेश केला व भालदापुरा, हंसापुरीत अनेक वाहनांची जाळपोळ केली. सोबतच शंभरावर वाहनांची तोडफोड करीत पोलिसांवरदेखील दगडफेक केली. त्यात ३५ हून अधिक अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. अतिरिक्त कुमक मागवत भालदारपुरा, चिटणीस पार्क येथील परिस्थिती पोलिसांनी नियंत्रणात आणली. कोम्बिंग ऑपरेशन राबवत पोलिसांनी ५० हून अधिक समाजकंटकांना ताब्यात घेतले. या प्रकरणात तीन पोलीस ठाण्यांत एकूण सहा गुन्हे दाखल झाले आहेत.

एफआयआरच्या प्रतीनुसार फहीम खान शमीम खानने (संजयबाग कॉलनी, यशोधरानगर) विहिंप-बजरंग दलाच्या आंदोलनानंतर ५० ते ६० जणांचा बेकायदेशीर जमाव जमवला व गणेशपेठ पोलीस ठाण्यात धडक दिली. त्याच्या तक्रारीवरून आंदोलन करणाऱ्या नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फहीम खान शमीम खान याच्यासोबत सैफ अली खान रौफ खान (वाठोडा), शेख नादीम शेख सलीम (यशोधरानगर), मोहम्मद शाहनवाज रशीद शेख (पारडी), मोहम्मह हरीश उर्फ मोहम्मद इस्माईल (गांधीबाग), युसूफ शेख उर्फ अब्दुल हफीज (महाल), शेख सादीक शेख नबी (महाल), मो.युसूफ उर्फ अब्दुल हफीज शेख (महाल), आसीम शेख समशुज जमा (भालदारपुरा) हेदेखील होते. पोलिसांनी गुन्हा दाखल केला व शांतता ठेवण्याबाबत समज देण्यात आली होती.

**१०० सीसीटीव्ही फुटेज ताब्यात**

दंगलग्रस्त परिसरातील जवळपास १०० सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामध्ये दिसणाऱ्या संशयितांची माहिती पोलिसांनी गोळा केली. सीसीटीव्ही फुटेजमधील अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेणे सुरु केले. जवळपास २०० आरोपींची ओळख पटवली आहे. ६० आरोपींना आतापर्यंत ताब्यात घेण्यात आले आहे.त्यामध्ये अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे.

### शहाद्यात औद्यो.वसाहत स्थापन करणार

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना थेट औद्योगिक प्रशिक्षण केंद्राशी जोडून त्यांचा कौशल्य विकास करून प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. याचा संपूर्ण खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करणार आहे. राज्यात अशाप्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. गुजरात राज्यातील सुरतमधील उद्योग नंदूरबार जिल्ह्यात आणण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठित करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून उद्योग वाढीसाठी प्रयतक करण्यात येतील. तसेच शहादा येथील औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यकता असल्यास बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

### जवानावर शासकीय इतमामात झाले अंत्यसंस्कार

तत्पूर्वी सजवलेल्या रथातून त्याची गणेशनगर भागातील निवासस्थ-ानापासून अंतिम यात्रा काढण्यात आली. या अंत्ययात्रेत मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील नागरिकांची उपस्थिती होती.यावेळी महिलांची ही उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी इंडियन आर्मीच्या नाशिक रोड आर्टिलरी सेंटरचे जवान नायब सुभेदार आर. अनंत, लान्स नायक डी.व्ही.कानडजे,लान्स नायक सुलभ शाह, नायक डी.सूर्या यांनी सलामी दिली.यावेळी जिल्हा सैनिक कार्यालयाचे जिल्हा सैनिक अधिकारी हर्ष बहादूर,जयवंत मराठे यांच्यासह उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ताजी पवार, पोलीस निरीक्षक निलेश देसले, तहसीलदार दीपक गिरासे, पोलीस पाटील युवराज पाटील, लोणखेडा उपसरपंच संजय दशरथ पाटील, शहादा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रा.मकरंद पाटील,ग्रामसेवक नितीन पाटील आदींनी पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केले.

### लेखा परीक्षणावर सेमिनारला प्रतिसाद

कटिबद्ध आहे असे संयोजकांनी सांगितले. धुळे सीए शाखेचे अध्यक्ष सीए यश आंचलिया, उपाध्यक्ष सीए संकेत खंडेलवाल, सचिव सीए प्रितेश चिंचोले यांनी व्यवस्थापन केले. या प्रसंगी शहरातील सनदी लेखापालांनी बहुसंख्येने उपस्थिती नोंदवली.

### भगवान महावीर स्वामी जन्म महोत्सव

दि.१० एप्रिल रोजी सकाळी ७ ते ८ वाजेच्या दरम्यान अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारी येथे होणार आहे. तदनंतर शहरातून भव्य वरघोडा शोभायात्रा रॅली आयोजित करण्यात आली आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमासाठी जैन बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन नवकार मंडळ संघटनांच्या वतीने अध्यक्ष दिनेश सूर्या यांनी केले आहे. सदर महोत्सवासाठी संस्थापक अध्यक्ष सुनील मुथा, ॲड. राजेश मुणोत, प्रमोद जैन, कांतीलाल चोरडीया, सुरजमल सूर्या, राजेंद्र बाफना, दिलीप पारख, किशोर शहा, भरत जैन, संतोष पाटणी, विनोद भन्साळी, रवींद्र जैन, हरीश शहा, नानकराम तनेजा, कमलेश गांधी, विजय दुगड, विजय कांकरिया, वर्धमान बेदमुथा, चारुल सुराणा, तुषार बाफना यांचे सह अनेक समाज बांधव परिश्रम घेत आहेत.

### गौण खनिजाची अवैध वाहतूक

उपवनसंरक्षक धुळे, वाय.पी.सातपुते सहा. वनसंरक्षक (रोहयो) धुळे, व्ही. के.खैरनार वनपरिक्षेत्र अधिकारी साक्री (प्रा.) व ओंकार एस. ढोले वनपरिक्षेत्र अधिकारी पिंपळनेर (प्रा.) यांच्या मार्गदर्शनाखाली. आर. व्ही.चौरे वनपाल दिघावे, श्रीमती.एस.ए.ठाकरे, वनरक्षक दिघावे, ए.एम. घरटे वनरक्षक विटाई, कायम वनमजुर मोहन गांगुर्डे, बाजीराव पवार, बबलु कुवर व उज्जैन चौधरी यांनी केली.

### शाळांना थकीत देयके तातडीने द्या!

तसेच एनपीएस योजना लागु असलेल्या कर्मचाऱ्यांचे एनपीएस हप्ते नियमित जमा होत नसुन जुलै २०२४ पासून एनपीएस हप्ते थकित आहेत. याबाबत योग्य तो निर्णय घेऊन थकित देयके मार्च २०२५ पुर्वी मंजुर करून जिल्हयातील संपूर्ण शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळवून ध्यावा अशी मागणी निवेदनामार्फत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद धुळे शाखेतर्फे करण्यात आली.यावेळी नितीन ठाकूर अध्यक्ष, शिक्षक परिषद धुळे महानगर, प्रकाश पाटील कार्यवाह धुळे महानगर प्रसाद पाटील, कार्यवाह धुळे जिल्हा ग्रामीण, प्रदिप दीक्षित माजी अध्यक्ष, जयेश कोर संघटन मंत्री, अभिजीत जोशी कोशाध्यक्ष, श्रीमती रेखा थोरात उपाध्यक्ष, सौ.सीमा डोंगरे, महिला आघाडी प्रमुख, मनोज सूर्यवंशी प्रसिद्धी प्रमुख, अमोल शिंदे, पंकज चौरे, राकेश मावची, ए.के. वानखेडे, प्रशांत नेरकर, कार्याध्यक्ष अशोक गिरी देवरे मदन-लालजी मिश्रा ज्येष्ठ मार्गदर्शक, भरतसिंह भदोरिया राज्य कार्यकारणी सदस्य, सुनील मोरे आदींनी केली आहे.

## विधानभवनात मेजवानीचा कार्यक्रम; मंत्री, अधिकारी गैरहजर
## विरोधी सदस्यांचा तिव्र आक्षेप, कामकाज दिवसभरसाठी तहकूब

**मुंबई दि.१९- विधानसभेत मागील दोन सप्ताहांपासून प्रलंबित नियम अन्वये विरोधीपक्षांच्या चर्चेच्या प्रस्तावाला संबंधित मंत्री आणि अधिकारी गैरहजर राहिल्याने विधानसभा कामकाज आधी तहकूब आणि नंतर स्थगित करावे लागले. यावेळी सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांकडून कामकाजाच्या पध्दतीबाबत तिव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.**

सायंकाळी सातच्या सुमारास विरोधी पक्षाच्या वतीने उपस्थित करण्यात आलेल्या विविध प्रश्नांचा समावेश असणाऱ्या नियम २९३ अन्वयेचे दोन प्रस्ताव सभागृहात चर्चेला आले असता केवळ एक मंत्री उपस्थित असल्यानं त्याला विरोधी सदस्यांनी आक्षेप घेतला, त्यावर सत्तारूढ सदस्यांनी पाठिंबा दिल्यामुळे सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. चर्चेची सुरुवात नाना पटोले यांनी केली, त्याचदरम्यान सुनील प्रभू यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे मंत्री आणि अधिकारी उपस्थित नसल्यानं कामकाज तहकूब करण्याची मागणी केली, त्याला भाजपाच्या सुरेश धस यांनी पाठिंबा दिला त्यावर पीठासन अधिकारी दिलीप बनकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केले. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर सुधीर मुनगंटीवार, बबनराव लोणीकर यां सत्ताधारी सदस्यांनी अधिकाऱ्यांच्या उप-स्थितीवर तीव्र आक्षेप नोंदवले.

भास्कर जाधव यांनी संसदीय कामकाजाला महत्व दिले जात नाही असं सांगत अधिकारी गॅलरीत बसायची तसदी घेत नाहीत याबद्दल खंत व्यक्त केली, अर्जुन खोतकर यांनी देखील या मागणीला पाठिंबा दिला. पीठासन अधिकारी दिलीप बनकर यांनी कामकाज पद्धतीवर आपलाही आक्षेप नोंदवला अधिकारी गॅलरीत उपस्थित राहणार नसतील कामकाज कसं चालवायचं असा सवाल करत त्यांनी आजचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले. दरम्यान काल मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री दिल्लीत केंद्रीय मंत्र्याच्या मुलाच्या लग्नाला गेल्याने विरोधकांच्या प्रस्तावाची चर्चा होवू शकली नाही. तर आज विधानसभा प्रांगणात अध्यक्षांकडून सदस्यांना साग्रसंगीत मेजवानीचे आयोजन करण्यात आल्याने मंत्री अधिकारी आणि अनेक सदस्य सभागृह सुरु असताना तेथे हजर न राहता मेजवानीच्या कार्यक्रमासाठी गेल्यानेही विरोधी तसेच सत्ताधारी बाजूच्या ज्येष्ठ सदस्यांनी नारजी व्यक्त केली.

## शहादा बस स्थानकाची दुरावस्था; प्रवाशांचे प्रचंड हाल
## दुरुस्तीसाठी पालकमंत्र्यांनी लक्ष घालण्याची मागणी

**शहादा, दि.१९ (प्रतिनिधी)- येथील बस स्थानकाची दुरावस्था झाली आहे मात्र महाराष्ट्र राज्य परिवहन विभागातर्फे अजून काहीही दखल घेतली जात नाही, बस स्थानकातील खडीकरण उखडले असून याचा प्रवाशांना अधिक त्रास होतो परिवहन विभागाने लक्ष घालून प्रवाशांना होत असलेला त्रास दुर करावा अशी मागणी होत आहे.**

शहराच्या मध्यवर्ती भागात येथील बस स्थानक असून प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते विविध आगाराच्या बसेस येथे ये - जा करतात दररोज दहा हजारापेक्षा जास्त प्रवाशांची ये - जा सुरू असते महामंडळाला दररोजचे बारा लाखा पेक्षा जास्त उत्पन्न मिळवून देणारे बस स्थानक असून सुद्धा महामंडळाचे याकडे दुर्लक्ष होत आहेत बस स्थानकातील खडी उखडली आहे यामुळे प्रवाशांच्या पायाला खडी लागत असते अनेकदा बस पकडतांना धावपळीत उखडलेल्या खडी मुळे प्रवाशांना दुखापत होते तसेच धूळ पण मोठ्या प्रमाणात उडत असते. शहादा बस स्थानक व आगार नूतनीकरणासाठी शासनाकडून तीस कोटी रुपये मंजूर असून याबाबत येथील डेपो मॅनेजर यांना प्रस्तुत प्रतिनिधीने विचारले असता त्यांनी सांगितले की, नूतनीकरणासाठी विभागीय कार्यालया मार्फत आमचा पाठ पुरावा सुरू असून मेजरमेंट वगैरे घेऊन गेल्याचे त्यांनी सांगितले धुळे विभागाचे विभाग नियंत्रक यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की हे काम सेंट्रल ऑफिस मुंबई यांचे असून तेथून सदर कामाचे टेंडर निघेल असे त्यांनी सांगितले याबाबतीत माझा पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी बोलतांना सांगितले. मात्र शहादा बस स्थानकाचा कामाला महामंडळाकडून कधी मुहूर्त लागणार असा प्रश्न उपस्थित होत आहे शहादा बस स्थानकावर प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असतात. प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी होत आहे.

**पालकमंत्र्यांनी लक्ष घालावे**

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी बस स्थानकाच्या कामात लक्ष घालून प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे मंत्री ड. कोकाटे यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामाच्या बाबतीत सूचित करावे जेणे करून बस स्थानकावर प्रवाशांना दिलासा मिळेल.

### विष प्राशन केले बालिकेचा मृत्यू

धुळे, दि.१९- साक्री तालुक्यातील जामदा गावातील सोळा वर्षीय अल्पवयीन बालिकेने काहि तरी विषारी औषध प्राशन करून जीवनयात्रा संपविल्याची घटना समोर आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, जामदा येथील अल्पवयीन बालिकेला आईने भाकरी बनवणे शिकुन घे, अस सांगितल्याचा राग आला. रागाच्या भरात काहीतरी विषारी औषध प्राशन केल्याने अत्यवस्थ जाणवू लागले. उपचारासाठी नंदुरबार सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले असता डॉ.प्रकाश गावित यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी निमामपूर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

## निधन वार्ता

### चंदाबाई शामसुखा



धुळे, दि.१९- शहरातील महावीर सोसायटीतील रहिवासी चंदाबाई राजेंद्र शामसुखा यांचे अल्पश: आजाराने त्रिची चेन्नई येथे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्या राजेंद्र शामसुखा यांच्या धर्मपत्नी होत.

### राजेंद्र विभांडीक



धुळे, दि.१९- पिंपळनेर ता.साक्री येथील राहवासी राजेंद्र आत्माराम विभांडीक (वय ६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा पश्चात दोन मुली, जावई आणि नातू असा परिवार आहे. ते व्यंगचित्रकार दिनेश धनगव्हाळ, संजय धनगव्हाळ व कपिल धनगव्हाळ यांचे मामा होत.

### पदमबाई बोरा



शहादा, दि.१९- येथील पदमाबाई बन्सीलाल बोरा (८२) यांचे ह्दयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, मुलगी, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रवीण व प्रगती मेडिकलचे संचालक रमेशचंद, विजयकुमार, अशोककुमार बोरा यांच्या आई होत.

## पान १ वरुन

### ऑनलाईन चिमणी गणना अभियान

पक्षीप्रेमी, वन्यजीव संस्था, शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय संस्थांचे कर्मचारी, ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी व सर्व नागरिक यांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, नागरिकांनी चिमणीसोबत सेल्फी काढून तो ८८०६३१४८४४ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावा, असेही सांगण्यात आले आहे. सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी डॉ.मकरंद गुजर यांनीही निसर्ग संरक्षणासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

### मनपाने करवाढ करतांना वीस टक्केच करावी

कर असेल त्याला ५०० रुपये कर आकारला गेल्यास नागरिक सहन कसे करणार? असा प्रश्न आहे. लोडबेरिंगच्या घराना आकारणी करणार कशी, तेच जनतेला सांगायला हवे, आरसीसी कमर्शियल आरसीसी घराचे बांधकाम असल्यास त्याला कर आकरणी कशी लावाल हे ही सांगायला हवे. तसेच जुने बांधकाम आणि आत्ताचे बांधकाम यांची आकरणी कशी कराल असे देखील आयुक्त यांच्याकडे विचारणा केली आहे. २००० मध्ये बांधलेल्या घरांना व आता २०२५ मध्ये बांधलेल्या घरांना समान घरपट्टी आकारली जाईल काय याबाबतही प्रशासनाची भुनिका स्पष्ट नाही.

अनेकदा शास्ती माफी केली आणि मालमाता कर हे दोन्ही विषय भिन्न आहेत. आता तर मालमत्ता जप्त करुन महापालिका ताब्यात घेऊ शकते इतके अधिकार मनप-ाला आहेत. त्यामुळे भविष्यात थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करुन लिलाव करण्याची कारवाई मनपा करु शकते. आयुक्त यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले आहे, आमचे म्हणणे शासन दरबारी सांगावे, मालमत्ता कर हा ३० टक्के न करता केवळ २० टक्के करावा, अशीही मागणी केली आहे. अवाजवी मालमत्ता कर लावला जात असेल तर ते चुकीचे ठरेल, आमच्यावतीने आयुक्त आपण राज्यकर्ते यांना सांगा असेही करनकाळ यांनी सांगितले.

### सव्वा कोटींची फसवणूक करणाऱ्या..

रूपये प्राप्त केले. त्यापैकी वियाराम पटेल यांना चार लाख परत केल्यानंतर उर्वरीत एक कोटी तीस लाख रूपये व पंधरा टक्के दरमहा ठरल्याप्रमाणे नफा परत केला नाही. नियोजनबध्द पध्दतीने आर्थिक फसवणुक केली. याप्रकरणी अंकुर पारसमल जैन बोथरा व दिव्या अंकुर जैन दोन्ही रा. पारसमल जैन मु.पो. खापर जैन धर्मशाळाजवळ अक्कलकुवा,जि.नंदुरबार या दाम्पत्याविरोधात आझाद नगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवकार मंडळ संघटन मिटींग
महावीर जन्म महोत्सव के उपलक्ष में धुलिया शहर के सभी श्रावक-श्राविका मंडळ और सांस्कृतिक कार्यक्रम मे जिन्हे भी सहभाग लेना है, उन सभी के कार्यक्रम की अंतिम रूपरेषा करने हेतू जैन समाज के चारो सांप्रदाय के अध्यक्ष इनके उपस्थिती मे दि.२२ मार्च को दोपहर ४ बजे जैन भवन ग.नं.२ मे मीटिंग का आयोजन किया है! सभी से निवेदन है की, समय पर पधारकर अंतिम रूपरेषा करने के लिए सहयोग करे!
-: निवेदक :-
नवकार मंडळ संघटन, धुलिया
-: संपर्क :-
कमलेश गांधी (९८२२४१७८६६)
विजय दुगड (९८२३१६३४४७)
चारुल सुराणा (८६९८५२४४५५)

पाहिजेत
कॉल सेन्टर & डेटा एन्ट्री
MS Excel
अनुभव आवश्यक
टायपिंग स्पीड - ४०
कामाची वेळ - सकाळी १० ते संध्याकाळी ६ (८ तास)
Full Time Job Only
-: ठिकाण :-
CS Enterprises
स्नेह नगर, धुळे
8999322698

- पाहिजेत -
● नर्स/स्टाफ
● RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

पाहिजे
घरकामासाठी व चार वर्षाच्या दोन मुली सांभाळण्यासाठी मुलगी किंवा बाई पाहिजे.
कामाची वेळ : सकाळी ९ ते संध्या.६ पर्यंत
-: संपर्क :-
9823073720

पाहिजेत
नवीन कापड दुकानासाठी
१) कॉम्प्युटर ऑपरेटर-१ जागा
२) सेल्समन- ३ जागा
३) सेल्सगर्ल- २ जागा
समक्ष भेटावे!
रॉयल मेन्स वेअर
ग.नं.४, बांबुगल्ली, धुळे

पाहिजेत
रेडिमेड दुकान कामासाठी हुशार अनुभवी मुले पाहिजेत. आकर्षक पगार. त्वरित भेटा!
श्री सत्यनारायण ड्रेसेस
ग.नं.२, जैन मंदिराजवळ, धुळे
9423344965

पाहिजेत
दुकान कामासाठी मुले पाहिजेत.
दत्त एजन्सीज
मेडीसीन मार्केट जवळ, ग.नं.५/६ ची बोळ, धुळे
02562 - 233569
9823724561

प्लॉट विकणे आहे
सर्व्हे नं. ९१, प्लॉट नं. २४ माहेश्वरी सोसायटी ८५० स्के. फुट नकाणे रोड साईबाबा मंगल कार्यालय जवळ, धुळे.
-:संपर्क :-
रमेश गंगाराम साळवे
मो. ७०६६५५९४५५, ९४२२२८८९४८

पाहिजेत
मेडीकल होलसेल दुकानामध्ये कामासाठी महिला/मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौन्टंट
२) सेल्समन बाहेरगावासाठी
३) हेल्पर/मदतनिस
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
8483032975

दुकान भाड्याने देणे
ग.नं.४, रथ गल्ली, गजानन टी समोरील दुकान भाड्याने देणे आहे
-: संपर्क :-
9420439886
8329799386

घर भाड्याने देणे आहे
१४६६/बी, स्वस्तिक सिनेमा मागे, शहा आणि कंपनीजवळ धुळे.
-: संपर्क :-
पिंगळे पेंटर
7588003981
7588003982

भाड्याने देणे आहे
धुळे शहरातील आग्रा रोड लगत आदर्श पुस्तकालया मागे तळघर गोडाऊन करीता भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9822671803

पाहिजेत
वेटर- ३
वॉचमन- १
नाईटसाठी पाहिजेत
ड्रायव्हर- १
हॉटेल न्यु नालंदा
अभय युवा कॉलेजसमोर, धुळे
7276645758

पाहिजेत
बॅनर मशिन ऑपरेटर-१ (कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक) व ऑफिस बॉय-१ त्वरित पाहिजे
-: संपर्क :-
सुयोग डिजीटल प्रिंटर्स
श्रीराम कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे

आंबे मिळतील!
हापुस आंबे मिळतील! लालबाग व बदाम आंबे मिळतील!
सुनिल ट्रेडिंग कंपनी
ग.नं.४, जय भोले पेटीस समोर, धुळे
9075050981
9766611207

पाहिजेत
होलसेल मेडीकल दुकानासाठी
१) दुकानात कामासाठी व माल वाटपसाठी मुले पाहिजे-३
२) धुळे लोकल व बाहेर-गाव बुकींगसाठी B.sc. पास असल्यास प्राधान्य जागा-२
समक्ष भेटा!
श्री साई फार्मा
ग.नं.५, धुळे

देणे आहे
हॉटेलचे सर्व सामान योग्य दरात देणे आहे
-: संपर्क :-
9511818734

फ्लॅट विकणे आहे
प्रभात नगर, देवपूर, धुळे येथील 1 BHK फ्लॅट विकणे आहे
-: संपर्क :-
9850093724

पाहिजेत
हॉस्पीटलसाठी रिसेप्शनिस्ट पाहिजेत.
-: संपर्क :-
9637233245
9359005053

Godrej
२५ वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.

आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट आणि वाढीव वॉरंटी...
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ■ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०